# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र.- ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१७/२३३५

दिनांक 21 JUN 2017

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद

उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड

पु.ला.शा.तं.लातूर,.म.नि.लातूर

**विषयः**- घरबांधणी अग्रिमावरील व्याज आकारणीबाबत

**संदर्भः**- वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/१२/विनियम दि.२० मे, २०१७

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, घरबांधणी अग्रिमावरील व्याजाची गणना करण्याबाबत यापुर्वी विभागातील संस्था कार्यालयाकडून मार्गदशन करण्याबाबत या कार्यालयास वेळोवळी विचारणा करण्यात येत होती. घरबांधणी अग्रिमावरील याज आकारणीबाबत वित्त विभागाकडून शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

सबब घरबांधणी अग्रीमावरील व्याजाची आकारणी करण्याबाबत सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकातील स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन त्यानुसार घरबांधणी अग्रिमावरील व्याज आकारणी बाबत कार्यवाही करण्यात यावी.

सोबतः-शासन परीपत्रक

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

घरबांधणी अग्रीम-
अग्रिमावरील व्याज आकारणीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/१२/विनियम
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २० मे, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: घबांअ-१०९२/प्र.क्र.२३८/९२/विनियम, दि.०३.०८.१९९३.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांकः घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम, दि.२०.०२.२०१५.

शासन परिपत्रक :-

संदर्भीय क्र.२ येथील दिनांक २०.०२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील घरबांधणी अग्रिमाच्या व्याजाच्या आकारणीसंदर्भातील परिच्छेद-१० संदर्भात काही प्रशासकीय विभागांकडून स्पष्टीकरण विचारण्यात येत आहे. सबब, घरबांधणी अग्रीम व्याज आकारणीबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संभ्रमाचा मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | व्याजाची परिगणना एकरुप पध्दतीने करण्यात यावी की टप्पा पध्दतीने करण्यात यावी. | संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०३.०८.१९९३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ ऑगस्ट, १९९० पासून मंजूर केलेल्या घरबांधणी अग्रिमावर व्याजाची आकारणी एकरुप दराने (Uniform Rate) ने करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर धोरण अदयापही लागू असल्याने व्याजाची परिगणना एकरुप पध्दतीने करण्यात यावी. |
| २. | अग्रिमाची रक्कम रु.१५.०० लक्षपेक्षा अधिक असल्यास व्याजाची परिगणना कशी करावी. | अग्रिमाची रक्कम रु.१५.०० लक्षपेक्षा अधिक असल्यास व्याजाची परिगणना संपूर्ण रकमेवर सरसकट ११.५० टक्के दराने करण्यात यावी. |

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१७०५२०१५२०४९८५०५ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

J. J. Valvi

Digitally signed by J. J. Valvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=816d3fe4c7042f66b4ac73a1f0087cd8fda3e115d42dc8b54c0e783064c80dc1, cn=J. J. Valvi
Date: 2017.05.20 15:22:54 +05'30'

5043
- 8 JUN 2017

(ज. जि. वळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. * प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-(१), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
२. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-(१), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
३. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
४. * महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर